पुण्य नगरी

# लीलावती हॉस्पिटलच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

## रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाला सुरुवात




**मुंबई :** वांद्रे येथील लीलावती रुग्णालयाने मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रम सुरू केला आहे. वंचित समुदायांसाठी रुग्णालयाच्या वतीने मोफत नेत्रसेवा पुरवल्या जाणार आहेत. मोतीबिंदू भारतातील ७० टक्के अंधत्व आणि ९० टक्के दृष्टीदोषाचे कारण आहे. रुग्णालयाचे राजीव मेहता आणि सीओओ नीरज उत्तमानी आणि नेत्ररोग विभागातील डॉक्टरांच्या पथकाने हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमाचा उद्देश डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवताना गरजूंना १०० टक्के अत्याधुनिक नेत्रसेवा देणे आहे.

भारतातील मोतीबिंदू हे अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमुख कारण ठरत आहे, ज्यामुळे देशभरातील लाखो जीवन प्रभावित होत आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसारख्या प्रभावी उपचार पर्यायांची उपलब्धता असूनही, पुरेशी काळजी प्रदान करण्यात आणि या वाढत्या डोळ्यांच्या आरोग्याच्या समस्येचे निराकरण करण्यात ते प्रभावी ठरत नाहीत. भारतातील मोतीबिंदू उपचारासमोरील आव्हाने, प्रतिबंधात्मक उपाय आणि लक्षणांबद्दल जागरूकतेचा अभाव, तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तींना वेळेवर उपचार मिळत नाही.

डॉ. नीरज उत्तमानी यांनी सांगितले की, मोतीबिंदू ही भारतातील एक मोठी समस्या ठरत आहे, ज्यामुळे ७० टक्के अंधत्व आणि ९० टक्के दृष्टीदोष आढळून येतात. या समस्येने लाखो लोक प्रभावित झाले आहेत, त्यामुळे या समस्येवर त्वरीत उपचार करणे आवश्यक आहे. मोतीबिंदूचे प्रमाण कमी करण्यासाठी वेळीच निदान करणे गरजेचे आहे. उपचारांबाबत वाढलेली जागरूकता महत्त्वाची आहे.

रोशनी मोतीबिंदू सेवेतंर्गत आम्ही २०० रुग्णांची तपासणी केली आहे, त्यांपैकी २९ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे. लोकांना अंधत्वाचा सामना करावा लागू नये, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. ५०० जणांवर शस्त्रक्रिया करण्याचा उद्देश आहे, असे लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे विश्वस्त राजीव मेहता यांनी सांगितले.

Smart Mumbai Edition
Apr 21, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com